**CNR No :- MHSI100001102024**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. २५/२०२४ :–

## –: निशाणी ६८ वरील आदेश :–

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्याच्या विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही व म्हणणे नाही'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ ते ३ चे म्हणणेनुसार, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत तसेच नि.क्र.०५ वर म्हणणे दयायचे होते. परंतु, आवश्यक ती माहिती तसेच जुने महसुल कागदपत्र वेळी न मिळाल्याने सदर प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे देण्याचे राहुन गेले. त्याच प्रमाणे प्रतिवादींना मुदतीबाबत माहिती नसल्याने मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. परीणामी त्यांचे विरुद्ध कैफियत नाही व म्हणणे नाही चा आदेश पारीत करणेत आला. सदरचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादीस अपरिमीत स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. कैफियत व म्हणणे न देण्यामागे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा कोणताही गैरहेतु नव्हता. सबब, सदरचे कैफियत नाही व नि.क्र.०५ वर म्हणणे नाहीचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी नि.क्र.६९ वर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस तीव्र विरोध दर्शविला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विरुद्ध दि.२०.१२.२०२४ रोजी सदरचे आदेश पारीत झालेले आहेत. त्यानंतर दि.०३.१०.२०२५ रोजी म्हणजे जवळपास १० महिन्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश VII नियम १

नुसार प्रतिवादीने समन्स मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत कैफियत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अपवादात्मक परीस्थितीत ९० दिवसांपर्यंत मुदत वाढवता येते. परंतु, प्रतिवादीने १० महिन्यांचा विलंब केल्याने त्यांच्या विरुद्धचा पारीत केलेला आदेश हा योग्य आहे. सदर आदेश रद्द झाल्यास खटला प्रलंबीत राहुन त्यात वादीचे नुकसान होणारे आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज जास्तीत जास्त खर्चाच्या आदेशासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत व नि.क्र.५ वर म्हणणे सादर न केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध कैफियत नाही तसेच नि.क्र.०५ वर म्हणणे नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे. अर्जामध्ये सादर केलेले कारण हे संयुक्तीक नाही. न्यायालयाचा व परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादीच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी यांना त्यांची कैफियत व म्हणणे सादर करण्याची परवानगी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. प्रतिवादींना त्यांची कैफियत व म्हणणे सादर करण्याची उचित संधी नाकारल्यास त्यांच्या न्यायहक्कांवर गदा येणारी आहे. प्रतिवादींनी सादर केलेल्या कैफियत व म्हणण्याद्वारे प्रकरण गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. केवळ या कारणास्तव प्रतिवादींनी केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचीत राहील. या सर्व

कारणांचा साकल्याने विचार करता, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :–

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु.१,२००/–(रुपये एक हजार दोनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.६८ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रत्येकी रु.४००/–(रुपये चारशे मात्र) वादीस आदा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.01.05 14:51:42 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०५.०१.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.